# राज्य परिवहन महामंडळ विभाग

## १.सिआर/१५८/नाग/१५

फिर्यादी हे एस.टी. बस वर वाहक आहेत. फिर्यादी यांचे विरूध्द तपासणी पथकाने तपासणीमध्ये एक प्रवासी विना तिकीट मिळुन आला व तक्रारीजवळ **रु.३६/— अतिरीक्त** मिळून आल्याने तक्रारी विरूध्द केस तयार करून कागदपत्र तयार केले. सदरची केस सेटल करून पुढील कारवाई न करण्याकरिता आरोपी लोकसेवक रूशीकांत काशिनाथ मेश्राम, वय ५१ वर्षे, आगार व्यवस्थापक, काटोल आगार, जि. नागपूर यांनी फिर्यादीस रु.५,०००/— लाच रक्कमेची मागणी केली.

दि. १४/०२/२०१५ रोजी आरोपी लोकसेवक रूशीकांत काशिनाथ मेश्राम यांनी तक्रारीकडुन रु.५,०००/— लाच रक्कम स्विकारल्यावरून रंगेहाथ पकडण्यात आले.

सदरबाबत पो. पो.स्टे. जरीपटका, नागपूर शहर येथे अप.क्र. ३१३४/१५ कलम ७, १३(१)(ड), १३(२) ला.प्र.का. १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात येवून आरोपी यांना अटक करण्यात आली आहे.